epaper.esakal.com/FlashCli



# आसमंत फाउंडेशनतर्फे रविवारी देवश्री नवघरे यांची मैफल

रत्नागिरी, ता. १५ : येथील आसमंत बेनोव्हलन्स फाउंडेशनने आयोजित शास्त्रीय गायन स्पर्धेतील विजेत्या नाशिकच्या देवश्री नवघरे यांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी कणकवलीत त्यांच्या मैफलीचे आयोजन केले आहे. गंधर्व फाउंडेशनतर्फे येत्या रविवारी (ता. १७) कणकवलीतील श्री दत्तक्षेत्र-आशिये मठ येथे गंधर्वसभा मैफल रंगणार आहे. आसमंतच्या सौजन्याने ही मैफल होईल. आसमंत व संस्कार भारतीच्या रत्नागिरी शाखेने शास्त्रीय संगीत स्पर्धा घेतली होती. त्यातील विजेत्यांची विविध ठिकाणी मैफल आयोजित करण्याचे आश्वासन आसमंतचे अध्यक्ष नंदकुमार पटवर्धन यांनी दिले होते. त्यानुसार नवघरे यांना कणकवलीत संधी मिळणार आहे. त्यांना तबलासाथ प्रसाद करंबेळकर, संवादिनीसाथ प्रसाद शेवडे करणार आहेत. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून पं. जितेंद्र अभिषेकी व डॉ. अशोक रानडे यांचे शिष्य पं. समीर दुबळे, नंदकुमार पटवर्धन, खल्वायन संस्थेचे खजिनदार श्रीनिवास जोशी उपस्थित राहणार आहेत. गंधर्व फाउंडेशनतर्फे दरमहा गंधर्व शास्त्रीय संगीत सभेचे आयोजन केले जाते. या वेळी युवा गंधर्व सन्मान देण्यात येईल.